**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थेस <u>शासनाची मान्यता देण्याबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र. सीटीसी-२०११/(१९८/२०११)/ताशि-५,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २६ ऑगस्ट, २०११.

**संदर्भ :** मा. उच्च न्यायालयाची रिट याचिका क्र. ५४६४/२०११ या प्रकरणी दिलेले आदेश.

<u>प्रस्तावना</u> :अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने **सहजीवन शिक्षण प्रसारक मंडळाचे, वसंतराव मोरे पॉलिटेक्निक, गट नं.६, टेहू, ता. पारोळा, जि.जळगाव** येथे तंत्रनिकेतन सुरु करण्यासाठी तत्कालीन कार्यपध्दतीनुसार त्यांच्या पत्र क्र एफ २२-३०८८/२०१०(डिप्लोमा इंजिनिअरिंग) ,दि. २१/५/२०१० अन्वये तंत्रनिकेतन सुरु करण्यास एल.ओ.आय.दिलेले होते. एल.ओ.आय.नंतर अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या तत्कालीन कार्यपध्दतीनुसार तज्ञ समितीमार्फत संस्थेची तपासणी करुन पात्र संस्थेस तंत्रनिकेतन सुरु करण्यासाठी एल.ओ.ए.देण्यात येत होते. तथापि सदर संस्थेस काही त्रुटीमुळे एल.ओ.आय.नंतर शैक्षणिक वर्ष २०१०-११ या वर्षात तंत्रनिकेतन सुरु करण्यासाठी एल.ओ.आय. देण्यात आलेली नाही. त्यामुळे संस्थेने मा.उच्च न्यायालयात यांचिका क्र.५४६४/२०११ दाखल केलेली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दि.२९/७/२०११ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

The respondents are directed to include the petitioner-college for centralized admission process for the courses recommended by the Expert Committee to the AICTE with the intake indicated in the report. in the list of such institutions displayed on the official website of the AICTE on or before 1st August 2011.

It is made clear that the petitioner shall not admit any students and accept the fees before getting the affiliation from respondent No.-4-Board and before complying with Regulation No.4.22 of AICTE (Grant of Approvals for Technical Instituions) Regulation 2010.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सदर संस्थेस त्यांचे पत्र क्र. डब्ल्यूआरओ/एलओआय/२०११/१-४३७६५७३८१, दि.२४/८/२०११ अन्वये मॅकेनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंनिनिअरिंग या चार पदविका अभ्यासक्रमास प्रत्येकी ६० प्रवेश क्षमतेसह मान्यता दिलेली असल्यामुळे मा.उच्च न्यथालयाचे आदेश विचारात घेता सदरहू संस्थेला त्यांचे अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-**सहजीवन शिक्षण प्रसारक मंडळाचे, वसंतराव मोरे पॉलिटेक्निक, टेहू, ता. पारोळा, जि.जळगाव** या महाविद्यालयाम शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून खालीलप्रमाणे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम त्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| | **अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम** | |
| १ | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| २ | इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग | ६० |
| ३ | कॉम्प्युटर इंजिनिअरिंग | ६० |
| ४ | इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग | ६० |

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता वर नमुद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.

५) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदवीका अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

७) संस्थने अभ्यासक्रम चालविण्यास पुर्ण वेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रीक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादी बाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपुर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

९) सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

११) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग अॅक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१२) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

(स्वाक्षरी) २६/५/२०११

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज.म.अंबादे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक.
४. संबंधित संस्था.

**प्रत माहितीसाठी** :-

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
३. निवडनस्ती.